**MHGA070014982025**

**<u>दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर), अहेरी, जिल्हा- गडचिरोली यांचे न्यायालयात</u>**

<u>(पिठासिन अधिकारी श्री. एस.एम.एच. शाहिद)</u>

**<u>एम.जे.सी. क्रं. १२३/२०२५ (ई-फाईलिंग प्रकरण)</u>**

**<u>अर्जदार</u>** :- १. श्री. राजेश अंक्का मुन्नुरवार,
वय ३५ वर्षे, व्यव. मजुरी,
२. श्री. अंक्का दुर्गा मुन्नुरवार,
वय ५९ वर्षे, व्यव. मजुरी,
दोन्ही रा. अहेरी, ता. अहेरी, जि. गडचिरोली.

**<u>विरूध्द</u>**

**<u>गैरअर्जदार</u>** :- निरंक

**उपस्थीती :-**

.......................................................................................

अर्जदारां तर्फे विद्वान अधिवक्ता - कु. जे.आय. ढोके
गैरअर्जदार निरंक

.......................................................................................

# <u>निशाणी क्रमांक ०१ खालील आदेश</u>

**<u>(दिनांक ३० मार्च २०२६ रोजी पारीत)</u>**

अर्जदारांनी भारतीय वारसाण कायदा, १९२५, चे कलम ३७२ अन्वये वारसाण प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. <u>मय्यत नागुबाई अंक्का मुन्नुरवार, यांचे दिनांक ०३/०५/२०२५ रोजी निधन झाले.</u> अर्जदार क्रं. १ हा मय्यत नागुबाई अंक्का मुन्नुरवार, यांचा मुलगा आहे. अर्जदार क्रं. २ हे मय्यत नागुबाई अंक्का मुन्नुरवार, यांचे पती आहेत. अर्जदारांना मय्यत नागुबाई अंक्का मुन्नुरवार, यांचे नावे बॅक ऑफ महाराष्ट्र, शाखा अहेरी येथील खाते क्रं. २०२४४०७१८८२ मधील जमा रक्कम रू. १,१३,३६३/-(रक्कम एक लाख तेरा हजार त्रैसष्ठ रूपये फक्त) मिळण्याकरीता अर्जदार हे मय्यत नागुबाई अंक्का मुन्नुरवार, यांचे वारस असल्याबाबत वारसाण प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदारांनी सदर अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदारचे अर्जावर जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला तसेच दैनिक "नवराष्ट्र" वृत्तपत्रामधून निशाणी क्रमांक १४ प्रमाणे दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर नोटीस देण्यात आली. अर्जदारांनी आपल्या कथनाच्या समर्थनार्थ निशाणी क्र. ०९ प्रमाणे अर्जदार क्रं. १ चे प्रतिज्ञापत्र दाखल केले. तसेच, नगरपंचायत, अहेरी यांनी निर्गमित केलेले वारसाण दाखल निशाणी क्रं. १०. नगर पंचायात, अहेरी यांनी निर्गमित केलेले मय्यत नागुबाई अंक्का मुन्नुरवार,

यांचे मृत्युप्रमाणपत्र निशाणी क्रं. ११. अर्जदार क्रं १ चे आधार कार्ड निशाणी क्रं. १२. बॅक ऑफ महाराष्ट्र येथील मय्यताचे खाते पुस्तीका अनुक्रमे निशाणी क्रं. १३ वर आहेत.

३. अर्जदार क्रं. १ हा मय्यत नागुबाई अंक्का मुन्नुरवार, यांचा मुलगा आहे. अर्जदार क्रं. २ हे मय्यत नागुबाई अंक्का मुन्नुरवार, यांचे पती आहेत. पुढे असे की, अर्जदारांचे शिवाय मय्यत नागुबाई अंक्का मुन्नुरवार, यांना इतर कोणीही वारस नसल्याचे प्रथमदर्शनी पुराव्यावरुन दिसुन येते. वारसाण प्रमाणपत्र देण्याबाबत ईतर कोणीही हरकत न घेतल्यामुळे मय्यत अर्जदार क्रं २ हे मय्यत नागुबाई अंक्का मुन्नुरवार यांचे पती असुन वर्ग-१ चे वारस नसल्याने अर्जदार क्रं २ ला वगळुण अर्जदार क्रं. १ हे मय्यत नागुबाई अंक्का मुन्नुरवार, यांचे वर्ग-१ चे वारस आहे अशी मान्यता देण्यात यावी असे या न्यायालयाचे मत आहे. सदर प्रकरण हे ई-फाईलिंग प्रणाली व्दारे दाखल करण्यात आले असुन प्रकरणाचे कोणतेही कागदपत्रे ( मुळ किंवा सत्यप्रति ) न्यायालयात उपलब्ध्द नाहीत. म्हणुण *“ माननिय मुंबई उच्च न्यायालय यांचे ई-फाईलिंग नियम २०२२ ” च्या नियम १०(३) मधील निर्देशानुसार संबंधित वकिलांनी प्रकरणाचे मूळ दस्त व कागदपत्रे त्यांचे कडे जतन करुण ठेवण्याचे निर्देश देण्यात येते.* प्रकरणाच्या निकाला करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशत: मंजुर.

२. अर्जदार क्रं. १. राजेश अंक्का मुन्नुरवार, हे मय्यत नागुबाई अंक्का मुन्नुरवार, यांचे वर्ग-१ चे वारस आहे अशी मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर वारसाण प्रमाणपत्र मय्यत नागुबाई अंक्का मुन्नुरवार, यांचे नावे बॅक ऑफ महाराष्ट्र, शाखा अहेरी येथील खाते क्रं. २०२४४०७१८८२ मधील जमा रक्कम रू. १,१३,३६३/- (रक्कम एक लाख तेरा हजार त्रैसष्ठ रूपये फक्त) ची उचल करण्याकरीता जारी करण्यात येते.

अर्जदाराचे नावे वारसान प्रमाणपत्र जारी करण्याकरीता अर्जदारा कडुन रक्कम रू. १,१३,३६३/-(रक्कम एक लाख तेरा हजार त्रैसष्ठ रूपये फक्त) करीता लागणाणी स्टॅम्प ड्युटी घेवुन वारसाण प्रमाणपत्र अर्जदारांचे नावे निर्गमित करण्यात यावे.

४. प्रकरणातील संबंधीत वकिल व पक्षाकारांना निर्देशित करण्यात येते की, “ माननिय मुंबई उच्च न्यायालय यांचे ई-फाईलिंग नियम २०२२ ” च्या नियम १०(३) मधील निर्देशाची पुर्तता करावी.

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.04.01 10:42:39 +0530

अहेरी
दि. ३०/०३/२०२६

(एस.एम.एच. शाहीद)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अहेरी.